# दोडामार्ग महाविद्यालयाचे वझरे येथे श्रमसंस्कार शिबीर

**▶दोडामार्ग (प्रतिनिधी)**

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी श्रमसंस्कार शिबीर २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत वझरे येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन रविवारी २१ डिसेंबरला दुपारी २ वा. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद हळबे, संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सूर्यकांत परमेकर, दोडामार्ग पंचायत समिती सभापती महेश गवस, उद्योजक विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सुचन कोरगांवकर आदी उपस्थित राहणार आहेत.



शिबीर कालावधीत श्रमदानाबरोबरच विविध विषयावर तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शनही आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये सोमवारी २२ डिसेंबर दु. ३ वा. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रकल्प अधिकारी दीपक माने यांचे ग्रामीण पर्यटन आणि धोरणे, मंगळवार २३ डिसेंबर रोजी दुपारी ३ वा. गोव्यातील प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ डॉ. राजेंद्र केरकर यांचे पर्यावरण आणि ग्रामस्वच्छता या विषयावर मार्गदर्शन, बुधवार २४ डिसेंबर रोजी डॉ. रामदास रेडकर यांचे महिलांचे कुपोषण एक समस्या, गुरूवार २५ डिसेंबर रोजी दोडामार्ग साहय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश पवार यांचे महिला सुरक्षाविषयक कायदे या विषयावर तर शुक्रवार २६ डिसेंबर रोजी दु. ३ वा. नेहरू युवा केंद्र ओरोसचे शिरीष लवांदे यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन होणार आहे.